!! ज्ञानदीप लावू जगी !!

**Aadishakti Dhandai Mata Shikshan Prasarak Sanstha's**

# Late Annasaheb R. D. Deore Arts & Science College

**Mhasadi, Tal. Sakri, Dist. Dhule (MS).**



## ACADEMIC YEAR – 2024-25

# National Service Scheme

## Annual Report-2024-25

# स्व. अण्णासाहेब आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय म्हसदी,
# ता. साक्री, जि. धुळे
## राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एकक
### नियमित कार्यक्रम अहवाल
### (शैक्षणिक वर्ष 2024-25)

==========================================================================

- दिनांक 21 जून 2024 रोजी ‘आंतरराष्ट्रीय योग दिन’ साजरा करण्यात आला.
- दिनांक 22 जुलै 2024 रोजी गुरुपौर्णिम□निमित्त मायोगश□पा□ल .डॉ .प्रा ., विद्यावर्धिनी महाविद्यालय धुळ□ यांच्या व्याख्यानाच□आयोजन करण्यात आल□
- दिनांक 16 जुलै 2024 रोजी महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आल□
- दिनांक 26 जुलै 2024 रोजी आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थ□्या माजी अध्यक्ष आईसाहब□ उषाताई द□□ यांच्या पुण्यतिथीनिमित्त रक्तदान शिबिराच□आयोजन करण्यात आल□या रक्तदान शिबिरात 39 युनि□रक्त संकलन करण्यात आल□
- दिनांक 02 ऑगस□2024 रोजी महाविद्यालयात तहसील कार्यालय साक्री आणि राष्ट्रीय स□ योजना स्थानिक एकक यांच्या संयुक्त विद्यमान□'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण' मार्गदर्शन कार्यक्रमाच□आयोजन करण्यात आल□
- दिनांक 8 ऑगस□2024 रोजी क्रांती दिन व जागतिक आदिवासी दिनानिमित्त म्हसदी गावातील स्वातंत्र्य सैनिकांच्या उपस्थितीत कार्यक्रमाच□आयोजन करण्यात आल□
- 11 ऑगस□2024 रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावच्या नामविस्तार दिनानिमित्त महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आल□
- 11 ऑगस□2024 रोजी एकदिवसीय शिबिराच□आयोजन करून महाविद्यालय परिसरात स्वच्छता करण्यात आली.
- दिनांक 12 ऑगस□2024 रोजी 'तंबाखूमुक्त युवा अभियान' राबविण्यात आल□यावळ□ सर्व स्वयंस□कांनी तंबाखूमुक्तीची सार्वजनिक शपथ घ□ली.
- दिनांक 13 त□15 ऑगस□2024 यादरम्यान 'हर घर तिरंगा' हा उपक्रम राबविण्यात आला.
- दिनांक 19 ऑगस□2024 रोजी रक्षाबंधन निमित्त महाविद्यालय परिसरातील वृक्षांना राखी बांधून पर्यावरण संवर्धनाचा संद□ दिला. त्याचप्रमाण□म्हसदी य□ील आश्रम शाळ□ील विद्यार्थ्यांना राख्या बांधण्यात आल्या.
- दिनांक 26 ऑगस□2024 रोजी 'एक प□मा क□नाम' या उपक्रमा अंतर्गत महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आल□
- दिनांक 5 सप□ंबर 2024 रोजी 'शिक्षक दिन' साजरा करण्यात आला.

- दिनांक 12 सप्टेंबर 2024 रोजी कबचौउमवि जळगावचे महात्मा गांधी तत्त्वज्ञान केंद्र, धुळे आणि महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्थानिक एकक यांच्या संयुक्त विद्यमाने 'अहिंसात्मक संज्ञापन कौशल्य कार्यशाळा' घेण्यात आली कार्यकार्यशाळेत चाळीस विद्यार्थी आणि दहा शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.
- दिनांक 17 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर 2024 या दरम्यान 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत 'स्वभाव स्वच्छता-संस्कार स्वच्छता' हा उपक्रम राबविण्यात आला.
- दिनांक 24 सप्टेंबर 2024 रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यादिवशी राष्ट्रीय सेवा योजनेचे धुळे जिल्हा समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेहोते.
- दिनांक 02 ऑक्टोबर 2024 रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त हा उपक्रम महाविद्यालय परिसरात स्वच्छता करण्यात आला.
- दिनांक 15 ऑक्टोबर 2024 रोजी माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरी करण्यात आली.
- दिनांक 03 ते 12 ऑक्टोबर 2024 या कालावधीमध्ये म्हसदी येथील धनदाई देवी मंदिरात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी नवरात्र उत्सवात सहाय्यता केंद्र सुरू गर्दी नियंत्रण, तसेच यात्रेकरूंना सूचना देऊन सहकार्य केले.
- दिनांक 31 ऑक्टोबर 2024 रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती महाविद्यालयात साजरी करण्यात आली.
- दिनांक 26 नोव्हेंबर 2024 रोजी भारतीय संविधान दिनाच्या निमित्ताने संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.
- दिनांक 06 डिसेंबर 2024 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन अभिवादन करून स्थानिक एककातर्फे साजरा करण्यात आला.
- दिनांक 27 डिसेंबर 2024 रोजी 'बाल लैंगिक शोषण अत्याचार प्रतिबंधक कायदा' (POCSO) या विषयावर कबचौउमविचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ.सचिन नांद्रे यांचे जनजागृती पर व्याख्यान . .आयोजित करण्यात आले.
- दिनांक 03 जानेवारी 2025 रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.
- दिनांक 12 जानेवारी 2025 रोजी स्वामी विवेकानंद यांची जयंती 'राष्ट्रीय युवा दिन' म्हणून तसेच राजमाता जिजाऊ भोसले यांची जयंती साजरी करण्यात आली.
- दिनांक 25 जानेवारी 2025 रोजी 'राष्ट्रीय मतदार दिना'च्या निमित्ताने स्थानिक एककातील स्वयंसेवकांनी मतदारांची शपथ सामूहिकपणे घेतली.

- 30 जानेवारी 2025 रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी 'हुतात्मा दिन' म्हणून साजरी करण्यात आली.
- दिनांक 15 फेब्रुवारी 2025 रोजी 'व्यसनमुक्ती अभियाना'चे आयोजन करण्यात आले.
- दिनांक 19 फेब्रुवारी 2025 रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती स्थानिक एककातर्फे साजरी करण्यात आली.
- दिनांक 25 फेब्रुवारी 2025 रोजी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने 'मरणोत्तर नेत्रदान जनजागृती अभियान' राबविण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयातील 50 पेक्षा अधिक प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी लेखी स्वरूपात मरणोत्तर नेत्रदान करण्याचा संकल्प केला. सदर कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या रा .ष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एककातील 102 स्वयंसेवक, तसेच प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब त्रिंबक मोताळे
कार्यक्रम अधिकारी रा.से.यो.

प्रो. सं. भ. गिरासे
प्राचार्य

## राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एकक
## स्वयंसेवकांचा विविध स्तरावरील शिबिर व उपक्रमातील सहभाग
## (शैक्षणिक वर्ष 2024-25)

| अ. क्र. | स्वयंसेवकाचे नाव | शिबिर/उपक्रम | स्थळ | स्तर | दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 1) नितीन सोनू ब□<br>2) गण□ बापूसाह□ चव्हाण<br>3) यश प्रभाकर ब□ □<br>4) कु. वैष्णवी महेंद्र द□ □<br>5) कु. ज्योत्स्ना सुभाष माळी | कुलगुरू उन्हाळी शिबिर-2024 | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | विद्यापीठ | 01 त□07 जुलै 2024 |
| 02 | 1) कु. यामिनी नारायण कुलथ<br>2) च□ रावसाह□ जाधव | राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पूर्व पथसंचलन निवड शिबीर | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | विद्यापीठ | 10 त□11 सप्□र 2024 |
| 03 | 1) कु. यामिनी नारायण कुलथ | राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व पथसंचलन राज्यस्तरीय निवड शिबीर | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांद□ | राज्य | 26 त□28 सप्□र 2024. |
| 04 | 1) कु. यामिनी नारायण कुलथ | आव्हान शिबिर-2024 | संत गाडग□बा अमरावती विद्यापीठ, अमरावती | राज्य | 07 त□16 नोव्हेंबर 2024 |
| 05 | 1) कु. अंकिता भिकन जाधव<br>2) यश कैलास न□र<br>3) पंकज युवराज कारंड | जिल्हास्तरीय प्रजासत्ताक दिन पतसंचलन प्रशिक्षण व निवड शिबिर | सि .गो .पा□ल महाविद्यालय, साक्री | जिल्हा | 21 त□26 जान□री 2025 |
| 06 | 1) कुजान्हवी दिलीप द□ .<br>2) कुस्न□ रतिलाल बर्वे .<br>3) गण□ भाऊसाह□ चव्हाण | विकसित भारत युवा संसद | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | जिल्हा | 21 मार्च 2025 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 07 | रोशनी मुकुंदा अहिर ऑक्□बर 2024 | विद्यापीठ स्तरीय निबंध स्पर्धा | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळ□ | विद्यापीठ | ऑक्□बर 2024 |

**डॉ. बाबासाहेब त्रिंबक मोताळे**
**कार्यक्रम अधिकारी रा.से.यो.**

**प्रो. सं. भ. गिरासे**
**प्राचार्य**






स्व. आण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान
म्हसदी. ता. साक्री. जि. धुळे
स्व.प्रा.डॉ. आईसाहेब उषाताई राम
यांच्या पुण्यस्मरणार्थ
रक्तदान शिबीर
२६ जुलै २०२४
राष्ट्रीय सेवा योजना एकक, क्रीडा विभाग, विद्यार्थी विका
आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे.
vivo V29
Mhasdi, Maharashtra Jul 26, 2024, 10:40


कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव संचलित
महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे
अहिंसात्मक संघर्ष कौशल्य कार्यशाळा
के. श्रीराम पोद्दार व के. शालीग्रामजी भारतीया संस्थापित
महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे


आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे,
स्व.आण्णासाहेब आर. डी. दे
कला व विज्ञान महाविद्या
म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे


स्व. आण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय
म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे
(NAAC Accredited B+ Grade)
'राष्ट्रीय सेवा योजना विभाग'
'एक पेड माँ के नाम'
उपक्रमांतर्गत
वृक्षारोपण


'राष्ट्रीय सेवा योजना'


'राष्ट्रीय सेवा योजना'
'NOT ME BUT YOU'





GPS Map Camera
म्हास्दी, महाराष्ट्र, भारत
Wc28+6r6, म्हास्दी, Mhasdi Pr.ner, महाराष्ट्र 424304, भारत
Lat 20.901399° Long 74.416067°
27/12/24 10:51 AM GMT +05:30
Google




OBJECTIVES
दि.२८/०९/२०२४
स्व.आण्णासाहेब आर.डी.देवरे कला व विज्ञान महाविद्यालय
म्हसदी
राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र
आयोजित
माहिती अधिकार


ग्रामपंचायत कार्यालय
माझं गांव स्वच्छ गांव
राष्ट्रीय सेवा योजना
स्वच्छता ही सेवा 2024


राष्ट्रीय सेवा योजना
स्वच्छता ही सेवा 2024
Y27
otography vasmar Mhasdi, Maharashtra Sep 22, 2024, 09:16


आयुष्मान भारत
आरोग्यवर्धिनी केंद्र
राष्ट्रीय सेवा योजना
स्वच्छता ही सेवा 2024




राष्ट्रीय सेवा योजना
स्वच्छता ही सेवा 2024


आपले सहर्ष स्वागत करित आहोत
राष्ट्रीय सेवा योजना
स्वच्छता ही सेवा 2024


स्व.आण्णासाहेब आर.डी.देवरे
कला व विज्ञान महाविद्यालय
म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे
Chemistry
Zoology


स्व.आण्णासाहेब आर.डी.देवरे
कला व विज्ञान महाविद्यालय
राष्ट्रीय सेवा योजना
NOT ME BUT YOU


'राष्ट्रीय सेवा योजना'
'NOT ME BUT YOU'


आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे,
स्व. आणासाहेब आर.डी.देवरे कला व विज्ञान महाविद्यालय, म्हसदी,
ता. साक्री, जि. धुळे
(NAAC Accredited)
'राष्ट्रीय सेवा योजना'
'NOT ME BUT YO


आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे,
स्व.आणासाहेब आर.डी.देवरे
कला व विज्ञान महाविद्यालय
म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे


(NAAC Accredited)
BUT YOU'




राष्ट्रीय सेवा योजना
ऑगस्ट क्रांती दिन
व


Department of Chemistry
OBJECTIVES
दि.05/12/2024
स्व.आण्णासाहेब आर.डी.देवरे कला व विज्ञान महाविद्यालय
म्हसदी
राष्ट्रीय सेवा योजना
६ डिसेंबर भारतरत्न
डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना
महापरिनिर्वाण दिनानिमित्त
विनम्र अभिवादन


OBJECTIVES
स्व.आण्णासाहेब आर.डी.देवरे कला व विज्ञान महाविद्यालय
म्हसदी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
लोकमान्य बाळ गंगाधर
यांना जयंतीनिमित्त
अभिवादन



सकाळ TODAY

# म्हसदी येथील शिबिरात ३९ जणांकडून रक्तदान

## डॉ. उषाताई देवरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध संस्थांचा उपक्रम

**सकाळ वृत्तसेवा**



**म्हसदी :** ग्रामपंचायत कार्यालयात रक्तदान शिबिरप्रसंगी उपस्थित (स्व.) अण्णासाहेब आर. डी. देवरे महाविद्यालयाचे पदाधिकारी, प्राचार्य, लोकप्रतिनिधी व प्राध्यापक.

म्हसदी, ता. २६ : धकाधकीच्या जीवनात माणूस माणसापासून दूर गेलेला आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे, प्रवास किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे विविध दवाखान्यांमध्ये रक्ताचा तुटवडा जाणवत असतो. एखाद्याचा जीव वाचविण्याची शक्ती एक थेंब रक्तामध्ये असते. रक्तदानातून हृदयाशी नाते जोडले जात असल्याचे मत संस्थेचे संचालक इंजिनिअर कुणाल देवरे यांनी व्यक्त केले.

आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या येथील (स्व.) अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात संस्थेच्या माजी अध्यक्षा प्रा. डॉ. उषाताई देवरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त धनदाईदेवी तरुण ऐक्य मंडळ, ग्रामपंचायत व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, क्रीडा विभाग, विद्यार्थी विकास विभाग यांच्यातर्फे शुक्रवारी ग्रामपंचायत कार्यालयात रक्तदान शिबिर झाले. संस्थेचे संचालक इंजि. कुणाल देवरे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. तेव्हा ते बोलत होते. प्राचार्य डॉ. संजीव गिरासे अध्यक्षस्थानी होते. धनदाईदेवी तरुण ऐक्य मंडळाचे अध्यक्ष सुभाष देवरे, निवृत्त विभाग नियंत्रक राजेंद्र देवरे, डॉ. कस्तुरी शिरीष देवरे, दर्शन सुनील सोनवणे, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. शिवाजीराव पाटील, सिनेट सदस्य डॉ. हृषीकेश चित्तम, जिल्हा राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील उपस्थित होते. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य आर. डी. देवरे, प्रा. डॉ. उषाताई देवरे यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. शिबिरात ३९ जणांनी रक्तदान केले. नाशिक येथील जनकल्याण रक्तपेढीने रक्तसंकलन केले. रक्तपेढीचे अरुण कुलकर्णी व सहकाऱ्यांनी सहकार्य केले. राजेंद्र देवरे, डॉ. कस्तुरी देवरे, दर्शन सोनवणे, प्राचार्य डॉ. गिरासे आदींनी मनोगत व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे, क्रीडा संचालक डॉ. जगदीश तोरवणे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विठ्ठल साळुंखे, राष्ट्रीय सेवा योजनेचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. हेमंत नांद्रे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. वनिता पवार, डॉ. उमेश गवई, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, आजी-माजी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. डॉ. जगदीश तोरवणे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी आभार मानले.

पुण्य नगरी

# रक्तदानामुळे हृदयाशी नाते जोडले जाते!

## कुणाल देवरे : देवरे महाविद्यालयात रक्तदान शिबिर



**म्हसदी :** धकाधकीच्या जीवनात माणूस माणसापासून दूर गेलेला आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे आणि प्रवास किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे विविध दवाखान्यामध्ये रक्ताचा तुटवडा जाणवत असतो. एखाद्याचा जीव वाचविण्याची शक्ती एक थेंब रक्तामध्ये असते. रक्तदानामुळे हृदयाशी नाते जोडले जाते, असे मत अभियंता कुणाल देवरे यांनी व्यक्त केले.

आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्वर्गीय अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात धनदाई देवी तरुण ऐक्य मंडळ, ग्रामपंचायत म्हसदी आणि महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, क्रीडा विभाग, विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर घेण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजीव गिरासे होते. या रक्तदान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी धनदाई देवी तरुण ऐक्य मंडळाचे अध्यक्ष सुभाष देवरे, सेवानिवृत्त विभागीय नियंत्रक राजेंद्र देवरे, डॉ. कस्तुरी देवरे, दर्शन सोनवणे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. शिवाजीराव पाटील, सिनेट सदस्य डॉ. ऋषिकेश चित्तम, जिल्हा राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ.हेमंतकुमार पाटील उपस्थित होते. शिबिरामध्ये ३९ रक्तदात्यांनी रक्तदान केले. नाशिक येथील जनकल्याण रक्तकेंद्राचे संचालक अरुण कुलकर्णी आणि सहकारी यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे, क्रीडा संचालक डॉ. जगदीश तोरवणे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विठ्ठल साळुंखे, राष्ट्रीय सेवा योजनेचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. हेमंत नांद्रे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. वनिता पवार, डॉ. उमेश गवई यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन डॉ. जगदीश तोरवणे यांनी केले. आभार डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी मानले.

Dhule Edition
Jul 28, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

सकाळ TODAY
धुळे/नंदुरबार SakalNews SakalMediaNews www.esakal.com

# दिशाहीन राजकारणामुळे देशाची अस्मिता धोक्यात

## डॉ. शिवाजी पाटील यांचे प्रतिपादन; देवरे महाविद्यालयात कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

म्हसदी, ता. १४ : आधुनिक तंत्रज्ञान व माहितीच्या काळातील वाढत्या चळवळी, दिशाहीन राजकारणाच्या संकल्पना, जाती-जातीतील विध्वंस, स्पर्धात्मक आंदोलने, स्वार्थाची पोळी भाजण्याची वृत्ती या सगळ्यांमुळे भारताची अस्मिता धोक्यात आली आहे. गांधीजींच्या स्वप्नातील भारत निर्माण करण्यासाठी गांधी विचार देशातील प्रत्येक नागरिकाची जीवनशैली बनावा, असे प्रतिपादन विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. शिवाजी पाटील यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संचलित धुळे येथील महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि येथील दिवंगत अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातर्फे झालेल्या 'अहिंसात्मक संज्ञापन कौशल्य'



म्हसदी : दिवंगत अण्णासाहेब आर. डी. देवरे महाविद्यालयात अहिंसात्मक संज्ञापन कौशल्य कार्यशाळेत मार्गदर्शन करताना विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. शिवाजी पाटील.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्राचार्य संजीव गिरासे अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य डॉ. पी. एस. गिरासे, प्रा. एल. जी. सोनवणे, सिनेट सदस्य डॉ.ऋषिकेश चित्तम, महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्राचे संचालक डॉ.संजय ढोडरे, राष्ट्रीय सेवा योजनेचे धुळे जिल्हा समन्वयक डॉ.हेमंतकुमार पाटील उपस्थित होते.

संजीव गिरासे यांनी आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.संजयकुमार देवरे, सचिव डॉ.संजीवनी देवरे आणि सर्व संचालक मंडळाने कार्यशाळेसाठी दिलेला शुभेच्छा संदेशाचे वाचन केले. द्वितीय सत्रात साधनव्यक्ती प्रा. एल.जी.सोनवणे यांनी बलशाली भारत बनण्याची ताकद तरुणांमध्ये असल्याचे सांगून महात्मा गांधीजींच्या स्वप्नातील भारत घडविण्यासाठी गांधीजींचे विचार अंमलात आणण्याची गरज व्यक्त केली. प्राचार्य डॉ.पी. एस. गिरासे यांनी महात्मा गांधीजींना अभिप्रेत असलेल्या समाजाची निर्मिती करण्यासाठी प्रत्येकाने स्वतःशी प्रामाणिक असणे महत्त्वाचे असून सत्य, निष्ठा, समर्पण, त्याग या मूल्यांचा स्विकार करावा, असे आवाहन केले. कार्यशाळेचा समारोप राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील यांच्या उपस्थितीत झाला.

महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्राचे संचालक डॉ.संजय ढोडरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. मिलिंदकुमार देवरे यांनी सूत्रसंचालन केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ.वनिता पवार, डॉ. हेमंत नांद्रे, डॉ.मिलिंदकुमार देवरे, रत्नाकर जाधव यांनी संयोजन केले.

सकाळ TODAY
धुळे/नंदुरबार SakalNews SakalMediaNews www.esakal.com

# संविधान लोकशाहीचा आत्मा : डॉ. देवरे

**म्हसदी, ता. २६ :** जगातील सर्वात मोठी लोकशाही भारतात आहे आणि लोकशाहीचा आत्मा हा संविधान आहे. आज भारतीय संविधान अमृत महोत्सवी वर्षांमध्ये पदार्पण करीत असल्याचा मनापासून आनंद होत आहे, असे प्रतिपादन आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.संजयकुमार देवरे यांनी केले.

दिवंगत अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थानिक एकक आणि राज्यशास्त्र विभागातर्फे भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. प्राचार्य संजीव गिरासे, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ.



म्हसदी : अण्णासाहेब आर. डी. देवरे महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त शपथ घेताना प्राध्यापक व विद्यार्थी.

शिवाजी पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे धुळे जिल्हा समन्वयक डॉ.हेमंतकुमार पाटील, प्राध्यापक, कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते. त्यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. देवरे यांनी पाठवलेल्या संदेशाचे वाचन डॉ.मोताळे यांनी केले.

सचिव डॉ.संजीवनी देवरे यांनीही या निमित्ताने प्राध्यापक- विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. मुंबई हल्ल्यातील शहीदांना अभिवादन करण्यात आले. डॉ.बाबासाहेब मोताळे यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. डॉ. वनिता पवार, डॉ. हेमंत नांद्रे आणि रासेयोच्या स्वयंसेवकांनी संयोजन केले.

दिव्य मराठी
धुळे सिटी 27-08-2024

# म्हसदीला एक पेड माँ के नाम अभियान

प्रतिनिधी | म्हसदी

येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या एककातर्फे एक पेड माँ के नाम हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमांतर्गत महाविद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य संजीव गिरासे, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. शिवाजी पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. प्राचार्य गिरासे म्हणाले की, पर्यावरणाचे संतुलन ढासळत असून ते पूर्ववत करण्यासाठी अधिकाधिक वृक्ष लागवड करणे काळाची गरज आहे. वृक्ष लागवड हा एका दिवसाचा उपक्रम नसून पृथ्वीतलावरील जीवसृष्टी अधिक काळ टिकण्यासाठी हा उपक्रम वारंवार राबवणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. डॉ. शिवाजी पाटील म्हणाले की, विविध कारणांमुळे वृक्षतोड मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे तापमान आणि पर्जन्यमानात कमालीचा चढ-उतार होतो आहे. त्यावर वृक्ष लागवड करणे हाच उपाय असल्याचे ते म्हणाले. डॉ. हेमंतकुमार पाटील यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी वृक्ष लागवडीचा संदेश देण्याचे आवाहन केले.



म्हसदी येथील देवरे महाविद्यालयात वृक्षारोपण करताना मान्यवर.

# देवरे महाविद्यालयात हर घर तिरंगा अभियान

म्हसदी, ता. १३ : शासनाच्या निर्देशानुसार व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिपत्रानुसार येथील (स्व.) अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात हर घर तिरंगा उपक्रम राबविण्यात येत आहे.

मंगळवारी (ता. १३) प्राचार्य संजीव गिरासे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. शारीरिक शिक्षण संचालक डॉ. जगदीश तोरवणे यांनी संयोजन केले. बुधवारी (ता. १४) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. शिवाजी पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे. राष्ट्रीय सेवा योजना एकक, क्रीडा विभाग आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्यामार्फत म्हसदीत राष्ट्रध्वजाविषयी जनजागृती रॅली काढण्यात येणार आहे. गुरुवारी (ता. १५) संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजयकुमार देवरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येईल. हर घर तिरंगा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी क्रीडा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विद्यार्थी विकास विभाग, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी परिश्रम घेत आहेत.

लोकमत

# बाल लैंगिक शोषण थांबविण्यासाठी समाजात समुपदेशनाची गरज

## डॉ. सचिन नांद्रे; पोक्सो कायद्याची दिली माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**म्हसदी** : समाजातील प्रत्येक बालकाला त्याचे हक्काचे शिक्षण मिळावे, यासाठी शासन स्तरावरून प्रयत्न केले जात आहेत. परंतु, पालकांची गरिबी आणि पोटासाठी होणारे स्थलांतर यातून ही मुले शिक्षणापासून वंचित राहतात. त्यांना बालकामगार म्हणून राबविले जाते. अशा बालकांवर विविध प्रकारचे अत्याचार होतात. पिडीत मुले आणि पालकांचे समुपदेशन व्हावे. बालकांचे लैंगिक शोषण आणि त्यांच्यावर होणारे लैंगिक अत्याचार थांबविण्यासाठी समाजाचे समुपदेशन करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी केले.

येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एककातर्फे नियमित उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात डॉ. नांद्रे बोलत होते.

### विकृती वाढविणाऱ्या लैंगिक बाबींपासून सावधान

समाजातील बालकांवर होणारे लैंगिक अत्याचार आणि शोषण थांबविण्यासाठी संवाद वाढविण्याची, तसेच मनन करण्याची आवश्यकता आहे. विविध वेबसाइटवर उपलब्ध असणाऱ्या समाजात विकृती वाढविणाऱ्या लैंगिक बाबींपासून सावधानता बाळगण्याचे आवाहन डॉ. सचिन नांद्रे यांनी उपस्थितांना केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य संजीव गिरासे होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे धुळे जिल्हा समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. सचिन नांद्रे पुढे म्हणाले की, समाजातील बालकांवर होणारे लैंगिक अत्याचार आणि शोषण थांबविण्यासाठी संवाद वाढविण्याची, तसेच मनन करण्याची आवश्यकता आहे.

विविध वेबसाइटवर उपलब्ध असणाऱ्या समाजात विकृती वाढविणाऱ्या लैंगिक बाबींपासून सावधानता बाळगण्याचे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

यावेळी त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना बाल लैंगिक शोषण अत्याचार प्रतिबंधक कायदा अर्थात 'पॉक्सो'संदर्भात माहिती दिली. याप्रसंगी अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य गिरासे यांनी समाजातील घटकांचे लैंगिक शोषण होणार नाही, याची काळजी घेण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी केले, तर आभार डॉ. वनिता पवार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे, डॉ. वनिता पवार, डॉ. हेमंत नांद्रे आदींनी केले.

Hello Dhule
Page No. 3 Jan 02, 2025
Powered by: erelego.com

पुण्यनगरी

# देवरे महाविद्यालयात उपक्रम



**म्हसदी** : येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्थानिक एकक आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने माहिती अधिकार दिन साजरा करण्यात आला. यावेळी राज्यशास्त्र विषयाचे डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी विद्यार्थ्यांना माहिती अधिकाराविषयी माहिती दिली. यावेळी डॉ. मिलिंदकुमार देवरे, डॉ. वाल्मिक आढावे, डॉ. संदीप नांद्रे, डॉ. विशाल शिंदे, प्रा. सिद्धार्थ ईखारे, घनश्याम देवरे, राजेंद्र देवरे, प्रवीण मोरे, रत्नाकर जाधव, बापू मोहिते आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

सकाळ TODAY
धुळे/नंदुरबार
SakalNews SakalMediaNews www.esakal.com

# देवरे महाविद्यालयात मानवी साखळीतून संदेश

■ सकाळ वृत्तसेवा

म्हसदी, ता. २७ : येथील दिवंगत अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एककतर्फे 'स्वच्छता ही सेवा' उपक्रमांतर्गत स्वयंसेवक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी 'मानवी स्वच्छता साखळी' तयार करत स्वच्छतेचा संदेश दिला.



म्हसदी : देवरे महाविद्यालयात मानवी साखळीद्वारे स्वच्छतेबाबत जनजागृती करताना रासेयोचे स्वयंसेवक.

स्वयंसेवकांनी स्वच्छतेसंदर्भात विविध घोषणा देऊन जनजागृती केली. या वेळी सर्व स्वयंसेवक, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी स्वच्छता शपथ घेतली. प्राचार्य संजीव गिरासे यांनी स्वच्छते संदर्भात समाजामध्ये जनजागृती करावी, असे आवाहन केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे, डॉ. वनिता पवार, डॉ. हेमंत नांद्रे, डॉ. वाल्मीक आढावे, डॉ. मिलिंदकुमार देवरे, डॉ. विजय जाधव, डॉ. विठ्ठल साळुंखे, प्रा. देवीदास भामरे, प्रा. योगेश मासुळे, प्रा. खेमसिंग वळवी, अरुण पवार, रत्नाकर जाधव, संजय बहिरम यांनी परिश्रम घेतले.

पुण्य नगरी

# देवरे महाविद्यालयात स्वच्छता हीच सेवा अभियान

**म्हसदी** : येथील स्व.अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एककातर्फे 'स्वच्छता ही सेवा' या पंधरवाडा आयोजित करण्यात आला आहे.



या अभियानांतर्गत महाविद्यालय परिसर, म्हसदी गावातील ग्रामीण रुग्णालय, बस स्थानक, बाजारपेठ, धार्मिक स्थळे, सार्वजनिक ठिकाणी प्लास्टिक, कचरा गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे या उपक्रमांतर्गत 'एक झाड आईच्या नावे' या शीर्षकाखाली विशेष वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गृहभेटीद्वारे जनजागृती करणे, एकल प्लास्टिक न वापरण्याबाबत जनजागृती करणे, स्वच्छतेची सार्वजनिक शपथ, स्वच्छता मानवी साखळी आयोजित करण्यात आली आहे. २ ऑक्टोबरला राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या जयंतीदिनी स्वच्छ भारत दिवस साजरा करून या पंधरवाड्याची सांगता करण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना सहभागी होण्याचे आवाहन आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजयकुमार देवरे, सचिव डॉ. संजीवनी देवरे, उपाध्यक्ष राजाराम देवरे, प्राचार्य संजीव गिरासे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. शिवाजी पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील, सिनेट सदस्य डॉ.ऋषिकेश चित्तम यांनी केले. या पंधरवाड्यातील विविध उपक्रमाचे संयोजन करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे, डॉ. वनिता पवार, डॉ. हेमंत नांद्रे परीश्रम घेत आहेत.

Dhule Edition
Sep 23, 2024 Page No. 03

दिव्य मराठी धुळे सिटी 25-09-2024

## स्वच्छता राखणे प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी : प्राचार्य गिरासे



देवरे महाविद्यालयातील व्याख्यानात बोलताना संजीव गिरासे

म्हसदी | स्वच्छता राखणे प्रत्येक नागरिकाची सामाजिक बांधिलकी आहे. स्वच्छता राखली तरच विकास होईल, असे मत प्राचार्य संजीव गिरासे यांनी व्यक्त केले.

येथील अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या एककातर्फे स्वच्छता ही सेवा या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले. त्या वेळी ते बोलत होते या वेळी विद्यापीठाचे अधिसभा सदस्य डॉ. ऋषिकेश चित्तम, डॉ. वाल्मीक आढावे, डॉ. बाबासाहेब मोताळे, डॉ. वनिता पवार उपस्थित होते.

सकाळ TODAY धुळे/नंदुरबार SakalNews SakalMediaNews www.esakal.com

## देवरे महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात



म्हसदी : (स्व.) अण्णासाहेब आर. डी. देवरे महाविद्यालयात सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना प्राचार्य डॉ. संजीव गिरासे व प्राध्यापक.

■ सकाळ वृत्तसेवा

म्हसदी, ता. ५ : येथील (स्व.) अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एककातर्फे माजी उपराष्ट्रपती भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा झाला.

पंचायत समितीचे सदस्य राजधर देसले, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ.हेमंतकुमार पाटील, क्रीडा संचालक डॉ. जगदीश तोरवणे, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. संदीप नांद्रे, विद्यार्थी विकास विभागप्रमुख डॉ. विठ्ठल साळुंखे, मराठी विभागप्रमुख डॉ.वाल्मिक आढावे, डॉ. मिलिंद देवरे, प्रा.देविदास भामरे, कार्यालयीन अधीक्षक अरुण पवार, घनश्याम देवरे, राजेंद्र देवरे, रत्नाकर जाधव उपस्थित होते. प्राचार्य डॉ.संजीव गिरासे यांनी आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.संजयकुमार देवरे यांनी दिलेला संदेश वाचला. राष्ट्र उभारणीच्या कार्यासाठी सुज्ञ नागरिक घडवण्याचे कार्य करणाऱ्या शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. संस्थेच्या सचिव डॉ.संजीवनी देवरे यांनीही शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवन-कार्याविषयीची माहिती प्राचार्य संजीव गिरासे यांनी दिली. संयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे, डॉ. जगदीश तोरवणे, डॉ. वनिता पवार, डॉ. हेमंत नांद्रे यांनी केले.

# पुण्यनगरी

# देवरे महाविद्यालयात तंबाखू मुक्त युवा अभियान



**म्हसदी** : येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एककातर्फे तंबाखूमुक्त युवा अभियान राबविण्यात आले.

या अभियानांतर्गत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजीव गिरासे यांनी विद्यार्थ्यांना तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनाने होणाऱ्या दुष्परिणामांविषयी माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांना तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांपासून दूर राहण्याचे आवाहन प्राचार्य गिरासे यांनी केले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी स्वयंसेवकांना तंबाखू मुक्तीची सार्वजनिक शपथ दिली. यावेळी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. शिवाजी पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे धुळे जिल्हा समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील, महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. जगदीश तोरवणे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विठ्ठल साळुंखे, कार्यालय अधिक्षक अरुण पवार, घनश्याम देवरे, राजेंद्र देवरे, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे, डॉ. वनिता पवार व डॉ. हेमंत नांद्रे यांनी केले.

Smart Dhule Edition
Aug 14, 2024 Page No. 3

# पुण्यनगरी

# देवरे महाविंद्यालयात वृक्ष संवर्धनाचा संकल्प



**म्हसदी** : येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्व. अण्णासाहेब आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एककातर्फे महाविद्यालय परिसरातील वृक्षांना राखी बांधून स्वयंसेवकांनी वृक्ष संवर्धनाचा संकल्प केला. याप्रसंगी कबचौ उमविचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.शिवाजी पाटील यांनी विद्यार्थ्यांना वृक्ष संवर्धनाचे महत्त्व सांगितले. रासयो कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे, डॉ. वनिता पवार, डॉ. हेमंत नांद्रे, कार्यालय अधीक्षक अरुण पवार यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि स्वयंसेवक उपस्थित होते.

Smart Dhule Edition
Aug 26, 2024 Page No. 3

पुण्यनगरी

# देवरे महाविद्यालयात वृक्षारोपण



**म्हसदी :** येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ नामविस्तार वर्धापन दिन व स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून वृक्षारोपण करण्यात आले. आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजयकुमार देवरे, उपाध्यक्ष राजाराम देवरे, विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. शिवाजी पाटील, धनदाई देवी तरुण ऐक्य मंडळाचे अध्यक्ष सुभाष देवरे, रासेयो जिल्हा समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील, सिनेट सदस्य डॉ. ऋषिकेश चित्तम, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि स्वयंसेवक उपस्थित होते.संयोजन कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे, डॉ. वनिता पवार, डॉ. हेमंत नांद्रे यांनी केले.

सकाळ TODAY



**म्हसदी :** आर. डी. देवरे महाविद्यालयात योगासने करताना प्राध्यापक व कर्मचारी.

# आर. डी. देवरे महाविद्यालयात योगासने, प्राणायाम प्रात्यक्षिके

**सकाळ वृत्तसेवा**

म्हसदी, ता. २१ : आजच्या धकाधकीच्या आणि झपाट्याने बदलणाऱ्या जीवनशैलीमध्ये उत्तम आरोग्यासाठी योग हा महत्त्वाचा घटक व्हावा. योगशक्तीमुळे स्थिर मन आणि उत्तम बुद्धिमत्ता त्याचबरोबर सकारात्मक दृष्टिकोन वाढत असल्याने योग हा प्रत्येक व्यक्तीचा जीवनाचा अविभाज्य घटक झाला, तर सुंदर जीवन जगता येईल, असे मत प्राचार्य डॉ. संजीव गिरासे यांनी व्यक्त केले.

येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्व. देवरे महाविद्यालयात दहावा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा झाला. प्राचार्य डॉ. गिरासे बोलत होते. क्रीडा संचालक डॉ. जगदीश तोरवणे यांनी विविध प्रकारची योगासने व प्राणायाम करून घेतले. यावेळी विविध प्रकारच्या योगासनांचा सराव क्रीडा संचालक डॉ. तोरवणे यांनी करून घेतला. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. शिवाजी पाटील, राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. ऋषिकेश चित्तम, कार्यालयीन अधीक्षक अरुण पवार, प्राध्यापक, कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

क्रीडा संचालक डॉ. तोरवणे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे, राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. वनिता पवार, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. हेमंत नांद्रे आणि विद्यार्थी विकास विभागाचे डॉ. विठ्ठल साळुंखे यांनी संयोजन केले.

## पुण्य नगरी

# देवरे महाविद्यालयात गुरु पौर्णिमा उत्सव साजरा



**म्हसदी :** भारतीय संस्कृतीत गुरु-शिष्य परंपरा फार प्राचीन आहे. गुरु मानवी जीवनातील अज्ञानरूपी अंधकार घालवून अध्यात्मिक तथा जीवन कौशल्य विकसित करणारा असतो. नम्रतेच्या माध्यमातून गुरू जवळ पोहोचता येते आणि गुरु यशाचा मार्ग खुला करीत असतो असे प्रतिपादन विद्यावर्धिनी महाविद्यालयाचे हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. योगेश पाटील यांनी केले. येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एकक व मराठी विभाग आणि साहित्य भारती यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुपौर्णिम उत्सव साजरा झाला. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा. डॉ. संजीव गिरासे होते. विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. शिवाजी पाटील, रासेयो जिल्हा समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील, प्रा. देविदास भामरे, डॉ. जगदीश तोरवणे, डॉ. विजय जाधव, सिनेट सदस्य डॉ. ऋषिकेश चित्तम, कार्यालय अधीक्षक अरुण पवार आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे, डॉ. वनिता पवार, डॉ. हेमंत नांद्रे, डॉ. मिलिंद देवरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रत्नाकर जाधव, सायली पाटील, वैष्णवी देवरे, करिष्मा नेरकर, अँकिता हयाळीस, यश बेडसे, नितीन बेडसे, सुयश अहिरे आदींनी परिश्रम घेतले.

## लोकमत

# देवरे महाविद्यालयात युवा कार्य प्रशिक्षण

### रोजगाराच्या संधीविषयी तज्ज्ञांचे मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**म्हसदी :** येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एकक आणि तहसील कार्यालय साक्री येथील महसूल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण मार्गदर्शन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात म्हसदी महसूल मंडळाचे मंडळ अधिकारी गजानन सोनवणे यांनी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' बाबत राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना या योजनेचे स्वरूप, उद्देश आणि कार्यपद्धती याविषयी सविस्तर माहिती दिली.

या कार्यक्रमाला बाविस्कर अनिल, बोरसे अमोल, जाधव रामचंद्र, प्रमोद निकम, डॉ. बाबासाहेब मोताळे, डॉ. वनिता पवार, रत्नाकर जाधव उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ वाल्मीक आढावे होते. य सूत्रसंचालन व आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी मानले.

कार्यक्रमाचे संयोजन राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एककाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे, डॉ. वनिता पवार आणि डॉ. हेमंत नांद्रे यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निराकरण करण्यात आले. विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Hello Dhule
Page No. 4 Aug 03, 2024
Powered by: erelego.com

सकाळ TODAY
धुळे/नंदुरबार
SakalNews SakalMediaNews www.esakal.com



**म्हसदी :** देवरे महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व 'रासेयो'चे समन्वयक.

# देवरे महाविद्यालयात स्वयंसेवकांना मार्गदर्शन

**म्हसदी, ता. ७ :** येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या (स्व.) अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थानिक एककामार्फत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

प्राचार्य संजीव गिरासे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याविषयी माहिती दिली. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ.शिवाजी पाटील, अधिसभा सदस्य डॉ.ऋषिकेश चित्तम, राष्ट्रीय सेवा योजनेचे धुळे जिल्हा समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील, कार्यालय अधीक्षक अरूण पवार, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, रासेयोचे स्वयंसेवक उपस्थित होते. रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ.बाबासाहेब मोताळे, डॉ.वनिता पवार, डॉ. हेमंत नांद्रे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

सकाळ TODAY

# देवरे महाविद्यालयात प्रतिमापूजन

■ सकाळ वृत्तसेवा

म्हसदी, ता. १ : येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या (स्व.) अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एककातर्फे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना पुण्यतिथीनिमित्त आणि लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. शिवाजी पाटील आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे धुळे जिल्हा समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील यांनी लोकमान्य टिळक आणि अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनकार्याबद्दल माहिती दिली.



**म्हसदी :** आर. डी. देवरे महाविद्यालयात लोकमान्य टिळक व अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन करताना प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी.

डॉ. जगदीश तोरवणे, डॉ. भाऊसाहेब काकडे, डॉ. उमेश गवई, डॉ. रमेश अहिरे, जितेंद्र देवरे, बापू मोहिते, रामदास शेवाळे, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे, डॉ. वनिता पवार, डॉ. हेमंत नांद्रे यांनी संयोजन केले.

लोकमत



देवरे महाविद्यालयात स्वातंत्र्यवीर सावरकर पुण्यतिथीनिमित्त अभिवादनप्रसंगी प्राचार्य संजीव गिरासे, प्रा. हेमंतकुमार पाटील, डॉ. मिलिंद देवरे, डॉ. जगदीश तोरवणे आदी.

# मानवता, परोपकाराच्या भावनेतून नेत्रदानाचा संकल्प करावा

## प्राचार्य गिरासे : देवरे महाविद्यालयात उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**म्हसदी** : मानवी जीवनाला सुंदर बनविणारा सगळ्यात महत्त्वाचा घटक हा नेत्र असतो. पंचेंद्रियात नेत्र हा प्रथम क्रमांकाचा अवयव असतो. आधुनिक वैज्ञानिक तंत्रज्ञानामुळे एखाद्या व्यक्तीचा नेत्र नेत्रहीन व्यक्तीला बसवून त्याचे जीवन सुंदर करता येते. मरणोत्तर नेत्रदानाच्या प्रचार आणि प्रसार समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी युवकांनी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून प्रयत्न करावा. मानवता व परोपकाराच्या भावनेतून नेत्रदानाचा संकल्प करावा, असे मत प्राचार्य प्रा. संजीव गिरासे यांनी व्यक्त केले.

येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या आण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्थानिक एकक आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त 'मरणोत्तर नेत्रदान जनजागृती अभियान' राबविण्यात आले. अध्यक्षीय समारोपप्रसंगी प्राचार्य गिरासे बोलत होते. सूत्रसंचालन व आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी केले.

**५०**

**पेक्षा अधिक उपस्थितांनी नेत्रदानाचा संकल्प केला.**

## नेत्रदान करण्याविषयी यावेळी झाले मार्गदर्शन

प्रा. हेमंतकुमार पाटील यांनी नेत्रदान कोण करू शकतो ?, नेत्रदान कसे करावे ? यासंदर्भात विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देत, भारतात दरवर्षी दोन लाख नेत्रदात्यांची आवश्यकता असून, प्रत्यक्षात मात्र फक्त २५ हजार व्यक्तीच नेत्रदान करतात. म्हणून, अधिकाधिक विद्यार्थ्यांनी स्वतः नेत्रदान करावे आणि इतरांना देखील नेत्रदान करण्यास प्रोत्साहित करावे, असे आवाहन केले.

**यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी नेत्रदान करण्याचा लेखी संकल्प केला. प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. विठ्ठल साळुंखे यांनी केले.**

## यांची होती उपस्थिती

यावेळी जिल्हा राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. हेमंतकुमार पाटील, डॉ. मिलिंद देवरे, डॉ. जगदीश तोरवणे, डॉ. रमेश अहिरे, प्रा. देविदास भामरे, डॉ. दीपाली सोनवणे, भैय्यासाहेब देवरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम अधिकारी डॉ. मोताळे, डॉ. वनिता पवार, शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

Hello Dhule
Page No. 3 Feb 27, 2025
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# वसमार विद्यालयात व्यसनमुक्ती अभियान



**म्हसदी :** पुणे येथील बिगर सरकारी संस्था पेस व म्हसदी येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेच्या आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एकक यांच्या संयुक्त विद्यमाने वसमार ता.साक्री येथील माध्यमिक विद्यालयात व्यसनमुक्त अभियान राबविण्यात आले.

याप्रसंगी साधनव्यक्ती म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बाबासाहेब मोताळे उपस्थित होते. विद्यार्थ्यांना व्यसनाचे दुष्परिणामांची माहिती सह व्यसनापासून मुक्त राहण्यासंदर्भात जनजागृती केली. राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. हेमंतकुमार पाटील यांनी विद्यार्थ्यांनी स्वतः नशेपासून दूर राहावे आणि इतरांनादेखील नशेपासून मुक्त करण्यास प्रेरित करावे असे आवाहन केले. मुख्याध्यापक संजय भदाणे यांनी विद्यार्थ्यांना संपूर्ण जीवन बरबाद करणाऱ्या व्यसनाधीनतेपासून दूर राहण्याचे आवाहन केले. पुणे येथील पेसच्या संयोजक डॉ. वीणा जोशी, आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजयकुमार देवरे, प्राचार्य डॉ. संजीव गिरासे यांच्या मार्गदर्शनाखाली साक्री तालुक्यातील विविध शाळा- महाविद्यालयांमध्ये व्यसनमुक्तीसाठी हा कार्यक्रम राबविला जात आहे. गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. विजय जाधव, उपशिक्षक सूर्यकांत काकुस्ते, जयश्री बेडसे, कुलदीप बागले, पंकज नेरकर, शिक्षकेतर कर्मचारी पंकज देवरे, बापू मोहिते, अशोक येळीस, निलेश मुजगे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. या अभियानाचे संयोजन डॉ. विजय जाधव, डॉ. हेमंतकुमार पाटील, डॉ. बाबासाहेब मोताळे, बापू मोहिते यांनी केले. तर उपशिक्षिका जयश्री बेडसे यांनी आभार मानले.

Dhule Edition

Mar 7, 2025 Page No. 03

लोकमत

# वसमार विद्यालयात व्यसनमुक्ती अभियान

लोकमत न्यूज नेटवर्क

**म्हसदी :** पुणे येथील बिगर सरकारी संस्था 'पेस' आणि म्हसदी येथील आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे आण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महावि द्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि राष्ट्रीय सेवा योजना स्थानिक एकक यांच्या संयुक्त विद्यमाने वसमार येथील माध्यमिक विद्यालयात व्यसनमुक्त अभियान राबविण्यात आले.

याप्रसंगी साधनव्यक्ती म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना व्यसनाचे दुष्परिणाम कोणकोणते आहेत याची माहिती दिली. तसेच व्यसनापासून मुक्त राहण्यासंदर्भात विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली. राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. हेमंतकुमार पाटील यांनी यावेळी विद्यार्थ्यांनी स्वत: नशेपासून दूर राहावे आणि इतरांनादेखील नशेपासून मुक्त करण्यास प्रेरित करावे, असे आवाहन केले.



## विद्यार्थ्यांना यांनी केले मार्गदर्शन

पुणे येथील पेसच्या संयोजक डॉ. वीणा जोशी, संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजयकुमार देवरे, प्राचार्य डॉ. प्रा. संजीव गिरासे यांच्या मार्गदर्शनाखाली साक्री तालुक्यातील विविध शाळा- महाविद्यालयांमध्ये व्यसनमुक्तीसाठी हा कार्यक्रम राबविला जात आहे. म्हसदी महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.विजय जाधव, सूर्यकांत काकुस्ते, जयश्री बेडसे, कुलदीप बागले, पंकज नेरकर, पंकज देवरे, बापू मोहिते, अशोक येळीस, नीलेश मुजगे आणि विद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

Hello Dhule
Page No. 2 Mar 07, 2025
Powered by: erelego.com

दिव्य मराठी धुळे सिटी 07-03-2025

# वसमार विद्यालयात केली व्यसनमुक्तीवर जनजागृती

प्रतिनिधी | म्हसदी

पुणे येथील बिगर सरकारी संस्था 'पेस' आणि म्हसदी येथील देवरे महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि रासेयो एककाच्या संयुक्त विद्यमाने वसमार विद्यालयात व्यसनमुक्त अभियान राबवण्यात आले. याप्रसंगी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी विद्यार्थ्यांना व्यसनाच्या दुष्परिणामांची माहिती दिली. तसेच व्यसनमुक्तीवर जनजागृती केली.

रासेयोचे धुळे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. हेमंतकुमार पाटील यांनी विद्यार्थ्यांना नशेपासून दूर राहावे आणि इतरांनादेखील नशेपासून मुक्त करण्यास प्रेरित करावे, असे आवाहन केले. मुख्याध्यापक संजय भदाणे यांनीही मनोगत व्यक्त केले. पुणे येथील पेसच्या संयोजक डॉ. वीणा जोशी, प्राचार्य डॉ. संजीव गिरासे यांच्या मार्गदर्शनाखाली साक्री तालुक्यातील विविध शाळा-महाविद्यालयांमध्ये व्यसनमुक्तीसाठी हा कार्यक्रम राबवला जात आहे. म्हसदी महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. विजय जाधव, उपशिक्षक सूर्यकांत काकुस्ते, जयश्री बेडसे, कुलदीप बागले, पंकज नेरकर आदी उपस्थित होते.

8:46 87%

NSS Maharashtra

**NSS Maharashtra**
1d ·

Tree plantation activity under 'Ek Ped Ma Ke Naam'  campaign by NSS unit of RD Deore Arts & Science Mahavidyalaya Mhasadi Sakri Dhule.

#Plant4Mother #एक_पेड़_माँ_के_नाम

Ministry of Youth Affairs and Sports, Government of India NSS India  Mansukh Mandaviya Rakshatai khadse Chandrakant Patil










Write a comment...

9:17 77%

X

Log in

Sign up

**Maharashtra Goa NSS**
@MaharashtraNSS

Follow

#SwachhataHiSeva campaign organised by NSS unit of RD Deore Arts & Science Mahavidyalaya Sakri Dhule - PHC Village cleaning & rally

#SwabhavSwachhata
#SanskaarSwachhata

@YASMinistry @_NSSIndia
@mansukhmandviya @khadseraksha
@ChDadaPatil



2:34 PM · Sep 22, 2024 · **19** Views

Log in | Sign up

**Maharashtra Goa NSS** Follow
@MaharashtraNSS

NSS unit of Devare College, Sakri made a human chain to raize awareness about clean india under
#SwachhtaHiSeva

#SwabhavSwachhata
#SanskaarSwachhata

@YASMinistry @_NSSIndia
@mansukhmandviya @khadseraksha
@ChDadaPatil




10:42 AM · Sep 28, 2024 · **11** Views

Log in

Sign up


**Maharashtra Goa NSS**
@MaharashtraNSS

Follow

#SwachhtaHiSeva Campaign by NSS unit of KBCNMU, Jalgaon

#SwabhavSwachhata
#SanskaarSwachhata

@YASMinistry @_NSSIndia
@mansukhmandviya @khadseraksha
@ChDadaPatil






**144 likes**

**yasministryindia** The NSS unit of Late Annasaheb R. D. Deore Arts & Science College, Dhule, Maharashtra organized a tree plantation drive under the #एक_पेड़_माँ_के_नाम / #Plant4Mother campaign. Let's create a 🌳 greener world 🌍 and make a difference for generations to come.

View 1 comment

| | |
|---|---|
| डॉ. बाबासाहेब त्रिंबक मोताळे | प्रो. सं. भ. गिरासे |
| कार्यक्रम अधिकारी रा.से.यो. | प्राचार्य |